# महाराष्ट्र शासन

# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

# DIRECTORATE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH

CET Cell, Opp. Govt.Dental College & Hospital Building, St.George's Hospital Compound, Mumbai - 400 001.
Tel.No. +91-22-22620361-65/22652257/59 Telegram:" MEDUCATNSEARCH"
Fax:+91-22-22620562/22652168 Website :http://www.dmer.org

---

क्र. संवैशिवसं/एमएचटी-सीईटी-२००९/अर्ज व माहिती पुस्तिका/विक्री/१-अ, दिनांक : ७/२/२००९

प्रति,

प्राचार्य
सर्व कनिष्ठ महाविद्यालये/उच्च माध्यमिक शाळा, महाराष्ट्र राज्य.

महोदय,

**आपणास नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !**

गतवर्षी प्रमाणेच यंदाही महाराष्ट्र शासनाने **आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र या तीन्ही अभ्यासक्रमांसाठी एकच सामाईक प्रवेश परीक्षा (एमएचटी-सीईटी-२००९) गुरुवार, दिनांक ७ मे, २००९ रोजी महाराष्ट्र राज्यातील जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी घेण्याचे निश्चित केले आहे.** गतवर्षी प्रमाणेच याही वर्षी विद्यार्थ्यांना माहिती पुस्तिका आणि परीक्षा अर्ज राज्यातील कनिष्ठ महाविद्यालये / उच्च माध्यमिक शाळांमार्फत उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांना त्यांची प्रवेश पत्रे (ॲडमिट कार्ड) आणि गुणपत्रिका सुध्दा याच मार्गाने उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

या बाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात **सध्या शिकत असणारे विज्ञान शाखेतील विद्यार्थी व गतवर्षी किंवा त्याआधी आपल्या महाविद्यालयातून बारावी परीक्षा विज्ञान शाखेतून उत्तीर्ण झालेले जे विद्यार्थी एमएचटी-सीईटी २००९ या परीक्षेस बसण्यास इच्छूक असतील अशा विद्यार्थ्यांकडून** अर्ज व माहिती पुस्तिका यासाठीची एकत्रित रक्कम दिनांक २५/२/२००९ पर्यंत जमा करण्याबाबतची नोटिस आपल्या महाविद्यालयाच्या नोटिस बोर्डवर लावावी. सदर कालावधीत जमा झालेल्या रक्कमेच्या अनुषंगाने आपणास किती अर्ज हवे आहेत, ती संख्या **आपल्या विभागातील नोटिफाईड महाविद्यालयांच्या कार्यालयास दिनांक २७/२/२००९ पर्यंत कळवावी.** या बाबत असेही स्पष्ट करण्यात येते की, **आपण कळविलेल्या संख्येपेक्षा अधिक विद्यार्थी प्रवेश परीक्षेसाठी इच्छुक असल्यास वितरणाचे वेळी आपण जितक्या प्रवेश अर्जाच्या शुल्काच्या रक्कमेचा डि.डि. घेऊन याल तितके अर्ज आणि माहीती पुस्तिका आपणास दिल्या जातील.**

आपणास असेही कळविण्यात येते आहे की, आपल्या महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या आणि शिकत असलेल्या विद्यार्थ्यांव्यतिरिक्त **अन्य महाविद्यालयातून १२वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज आपल्या महाविद्यालयात जमा करुन घेवू नयेत.** सदरच्या कामाबाबत आपल्या महाविद्यालयास दर वर्षी प्रमाणेच प्रत्येक अर्जासाठी हाताळणी शुल्क आपल्या जिल्हयासाठी या संचालनालयामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या नोटिफाईड महाविद्यालयामार्फत प्राप्त होईल. माहिती पुस्तिका आणि अर्ज वितरणाची तारीख व पात्रतेच्या अटी याबाबत संचालनालयामार्फत वृत्तपत्रांमध्ये नोटीफीकेशन प्रसिध्द् करण्यात आले आहे. तसेच सदरचे नोटीफीकेशन आणि अन्य आवश्यक बार्बींची माहीती संचालनालयाच्या ***"www.dmer.org"*** या संकेतस्थळावर (वेबसाईट) सुध्दा माहीतीसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

एमएचटी-सीईटी २००९ या सामाईक प्रवेश परीक्षेच्या अर्जाची किंमत खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता रु. ७००/- आणि मागास संवर्गातील विद्यार्थ्यांना रु. ५००/- अशी आहे. तरी आपल्यामार्फत आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता अर्ज प्राप्त करुन घेण्यासाठी खुल्या संवर्गातील आणि मागास संवर्गातील विद्यार्थ्यांकरिताचे योग्य त्या रक्कमेचे दोन स्वतंत्र डी.डी. नोटीफाईड महाविद्यालयास सादर करावेत. सदर शुल्कामध्ये तीनही अभ्यासक्रमांच्या माहीती पुस्तिका, प्रवेश परीक्षेसाठी असणारा एकच परीक्षा अर्ज आणि परीक्षा शुल्काचा समावेश आहे. सदरचा डि.डि. **"Competent Authority (MH-CET), Mumbai,"** या नावाने मुंबई येथे देय **(Payable at Mumbai)** असणारा असणे आवश्यक आहे. अर्ज व माहिती पुस्तिका प्राप्त करुन घेताना नोटीफाईड महाविद्यालयास खालीलप्रमाणे नमूद तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे विनंती अर्ज आपल्या महाविद्यालयाच्या लेटर हेडवर सादर करावा.

a) No. of Open category candidates x Rs. 700/- = Rs.________

b) No. of Reserved category candidates x Rs. 500/- = Rs.________

सोबत आपल्या जिल्हयासाठी नियुक्त करण्यात आलेल्या विभागीय प्राधिकारी आणि नोटीफाईड महाविद्यालयांची यादी **"Annexure - A"** मध्ये दर्शविण्यात आली आहे. उपरोक्त कार्यवाही सुरळीतपणे पार पाडण्याकरीता दरवर्षी प्रमाणेच यंदाही आपल्याकडून या संचालनालयास पूर्ण सहकार्य मिळेल असा मला विश्वास आहे.

आपला विश्वासू,
सही/-
सक्षम प्राधिकारी व संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

# ANNEXURE - A

## Divisional Authorities, Districts & Notified Colleges Under their Jurisdiction

| Divisional Authority | Districts | Notified Colleges for the concerned Districts Authorities |
|---|---|---|
| 1) Dean, Grant Medical College, Mumbai. PH-(022) 23735555 | Mumbai Urban | Grant Medical College, Sir J.J. Hospital, Byculla, Mumbai-400 008 |
| | Mumbai Suburban | R.A. Podar Ayurved College, Dr. Annie Besant Rd., Worli, Mumbai - 400 018 |
| | Thane | Rajiv Gandhi Medical College & Cht. Shivaji Maharaj Hospital, Kalva, Thane-400 065 |
| | Raigad | KES Chandrakant Hari Keluskar Homoeopathic College, Alibaug, Dist.Raigad-402 201 |
| 2) Dean, B.J.Medical College Pune PH-(020) 26128000 | Pune | B. J. Medical College, Pune- 411 001 |
| | Ahmednagar | Gangadhar Shastri Gune Ayurvedic Mahavidyalaya, Vishrambaug, Ahmednagar |
| | Satara | SCM Aryangla Ayurvedic College, ITI Road, Gendamal, Satara-415 002. |
| | Solapur | Dr.Vaishampayan Memorial Medical College, In-front of District Court,Solapur-413 003. |
| 3) Dean, Govt. Medical College, Miraj, Dist.Sangli PH-(0233) 22331158, 2232090 | Sangli | Govt. Medical College, Pandharpur Rd., Miraj, Dist - Sangli - 416 410 |
| | Kolhapur | R.C.S.M. Govt. Medical College, CPR Hosp. Compound, Kolhapur-416 002. |
| | Ratnagiri | R.P.Gogate College of the Science and R.V.Jogalekar College of Commerce, A/P - Ratnagiri, T/D - Ratnagiri - 415 612. |
| | Sindhudurga | Bhaisaheb Sawant Ayurvedic Mahavidyalaya, Khaskilwada, Sutikgruha Complex, Sawantwadi, Dist. Sindhudurga-416 510. |
| 4) Dean, SBH Govt. Medical College, Dhule PH-(02562) 239407 | Dhule, Nandurbar | Shri. Bhausaheb Hire Government Medical College, Mumbai-Agra-Highway, Chhakarbardi Campus, Near Residency Park, Dhule-424 301. |
| | Nashik | Ayurvedic College, Ganeshwadi, Near Garge Maharaj Bridge, Panchawati, Nashik- 03 |
| | Jalgaon | Chaitanya Ayurvedic College, Sakegaon, Tal. Bhusaval, Dis. Jalgaon. |
| 5) Dean Govt. Medical College, Aurangabad PH-(0240) 2402412-17 2402028 | Aurangabad | Government Medical College, Panchakki Road, Aurangabad-431 001. |
| | Jalna | Government Dental College & Hospital, Govt. Medical College Campus, Dhanwantari Nagar, Aurangabad- 431 001. |
| | Beed | Swami Ramanand Teerth Rural Medical College, Ambajogai, Dist-Beed- 431 517 |
| | Osmanabad | Government Ayurved College, Solapur Road, Osmanabad-413 501. |
| 6) Dean, Dr. Shankarrao Chavan Govt Medical College, Nanded PH-(02462) 238527 | Parbhani, Hingoli | P.D. Jain Homoeopathic College, Vakil Colony, Parbhani-431 401 |
| | Latur | Government Medical College, Civil Hospital Campus, Latur-412 513. |
| | Nanded | Dr. Shankarrao Chavan Government Medical College, Vazirabad, Nanded- 431 601 |
| 7) Dean Govt. Medical College, Nagpur PH-(0712) 2743588 2701580 / 2700256 | Nagpur | Government Medical College, Hanuman Nagar, Nagpur-440 003. |
| | Wardha | Indira Gandhi Medical College, Central Avenue Road, Nagpur-440 018. |
| | Bhandara | Government. Dental College & Hosp., Medical College Campus, Nagpur-440 003. |
| | Gondia | Mahadeorao Shivankar Ayurvedic College, Kudwa, Dist- Gondia-441 614. |
| | Chandrapur | Purushottam Bagla Homoeopathic College & Hospital, Bagle Nagar, Babu Peth, Chandrapur-442 403 |
| | Gadchiroli | Government Polytechnic, MIDC Road, Gadchiroli - 442 605. |
| 8) Dean, Govt. Medical College, Akola PH-(0724) 2431960 | Yavatmal | Shri. Vasantrao Naik Government Medical College, Yavatmal-445 001. |
| | Amravati | Dr. Panjabrao Alias Bhausaheb Deshmukh Memorial Medical College, Shivaji Nagar, Amravati-444 603. |
| | Akola, Washim | Government Medical College, General Hospital Campus, Akola - 444 001 |
| | Buldhana | Panchasheel Homoeopathic Medical College, Kalanagar, Khamgaon, Buldhana - 444 303. |

**N.B.** The notified colleges shall be responsible for supply of information brochures/ application forms, receipt of application forms, dispatch of admit cards & mark sheets to the candidates through their respective Jr. Colleges / High schools.

**MKB Area:** Candidates of Maharashtra-Karnataka Disputed Border(MKB)Area from **Bidar & Gulbarga** should submit their application forms to Dean **Govt. Medical College, Latur** and residents of **Belgaum & Karwar** districts should submit the application forms to Dean, R.C.S.M. **Government Medical College, Kolhapur**.